महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००0१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२३/प्र.क्र.१५/सीईटी/२०२४/१०३६ दिनांक - २६/०६/२०२४.

## जाहीर सूचना
### एमएचटी-सीईटी २०२४
### प्रश्नपत्रिका आणि उत्तर तालिका उपलब्ध करुन देणेबाबत

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एमएचटी-सीईटी २०२४ ही सामाईक प्रवेश परीक्षा ऑनलाईन पध्दतीने विविध सत्रात घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेनंतर उमेदवारांना त्यांच्या लॉगीनमध्ये ऑनलाईन पध्दतीने आक्षेप नोंदणी सुविधा पीसीबी ग्रुप करीता दिनांक २२ मे, २०२४ ते २४ मे, २०२४ या कालावधीत तसेच पीसीएम ग्रुप करीता दिनांक २४ मे, २०२४ ते २६ मे, २०२४ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. प्राप्त झालेल्या आक्षेपांचे विषय तज्ज्ञां करवी निराकरण करण्यात आलेले असून याबाबतचा अहवाल या कार्यालयाच्या संकेतस्थळावर दिनांक ०७ जून, २०२४ रोजी उमेदवार/ पालक/ संस्था यांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आलेला होता. तद्नंतर या कार्यालयाने दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या निकाल प्रक्रिया पध्दतीचा वापर करुन आणि दिनांक ०७ जून, २०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार योग्य त्या सुधारणा करुन सुधारीत उत्तर तालिकेनुसार निकाल तयार करुन त्याची विशेष तज्ज्ञां करवी पडताळणी करुन दिनांक १६ जून, २०२४ रोजी घोषित करण्यात आलेला आहे.

तथापि, या कार्यालयास भेट दिलेल्या उमेदवार/पालक यांच्याशी चर्चा केल्यानंतर काही उमेदवारांनी उपरोक्त कालावधीत प्रश्नपत्रिका, उत्तर तालिका यांचे अवलोकन केले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तथापि, उमेदवार/ पालक यांच्या समाधानांसाठी पुन्हा एकदा प्रश्नपत्रिका, उमेदवारांनी प्रश्ननिहाय दिलेले उत्तर आणि सुधारीत उत्तर तालिकेनुसार अचुक उत्तर पुढील तक्त्यात नमुद वेळापत्रकानुसार उमेदवारांच्या लॉगीनमध्ये केवळ पाहण्याकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे याची सर्व उमेदवार व पालकांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| एमएचटी सीईटी २०२४ | पीसीएम ग्रुप | २७/०६/२०२४ ते २८/०६/२०२४ |
| | पीसीबी ग्रुप | २९/०६/२०२४ ते ३०/०६/२०२४ |

सही/-
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**